


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# महाराष्ट्रातील आदिवासींची वाद्यकला

संशोधक विद्यार्थी

**श्री प्रमोद शंकरराव मसराम**

सेवासदन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय सीताबर्डी,

नागपूर.

मार्गदर्शक

**डॉ. सीमा मालेवार**

सहयोगी प्राध्यापक,

वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था,

नागपूर.

**प्रस्तावना :**

आदिवासी म्हणजे धरतीची लेकरे. निसर्गाच्या कुशीत जीवन जगणारे झाडाझुडपातून व पर्वताच्या दऱ्याखोऱ्यातून भटकणाऱ्या मा आदिवासींची प्राचीन परंपरा, विविध चालीरीती, त्यांची बोलीभाषा, त्यांचे उत्सव आणि सणातील नैसर्गिक गोष्टीतून होणाऱ्या त्मांच्या संस्कृतीचे दर्शन सर्वांनाच मोहविणारे आहेत.

आदिवासी जमातीतील संस्कृती त्यांच्या सांस्कृतिक प्रथा, परंपरा आणि कलेची माहिती देणाऱ्या कलांपैकी एक कला म्हणजे आदिवासी लोकांची वाद्य कला होय. वाद्ययंत्र सुराची निर्मिती करतात आणि गायक त्यांच्याशी आवाज मिळून गात असतात. काही आदिवासी जमातींमध्ये ढोल वाजून कंठातून ध्वनी निर्मिती करतात. दोरी किंवा तारांमुळे वाजणारे वाद्य यंत्र, हवेमुळे वाजणारे वाद्य यंत्र आणि थाप मारून वाजविणारे वाद्य यंत्र असे वाद्ययंत्राचे तीन भाग दिसून येतात. आदिवासींमध्ये दोरीपासून, तारांपासून वाजविले जाणारे वाद्य यंत्र फारशा प्रमाणात दिसून येत नाही. परंतु तोंडातील हवेद्वारे वाजविल्या जाणाऱ्या वाद्ययंत्रांमध्ये बासरी सारखे वाद्ययंत्र आदिवासी समाजात अधिक प्रमाणात वापर केल्या जातो.

आदिवासी लोक लाकडापासून, प्राण्यांच्मा शिंगांपासून, वेळूपासून आणि माती पासून इ. विविध प्रकारच्या साहित्यापासून वाद्य यंत्र बनवितात. काही आदिवासी जमातींमध्ये नाकाने वाजविले जाणारे वाद्य यंत्र सुद्धा दिसून येते. आदिवासी समाजात थापे देऊन वाजविल्या जाणारे वाद्य यंत्र फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. या प्रकारच्या वाद्ययंत्रांमध्ये ढोल, नगारा आणि ढोलक अधिक लोकप्रिय आहे. एकाच्या गळ्यात मोठा ढोल अडकवितात व दुसरे दोघे ते वाजवितात. एका काडीने हाताने आणि दोन काड्यांनी ढोल वाजवीला जातो. वाद्ययंत्रांमध्मे घुंगरू चा उपयोग सुद्धा मोठ्या प्रमाणावरती केला जातो.

आदिवासींमध्ये ढोल वाजविण्याचे अनेक प्रकार आढळतात. चामड्याचा उपयोग करून ढोल बनविले जातात. चामड्यावर थाप दिल्यास आवाज निघतो. ढोलाचे वादन एक प्रकारचे आनंदाचे प्रतीक आहे. आदिवासी समाजामध्ये देवपूजा, सण, उत्सव, विवाह याप्रसंगी वाद्य वाजविल्या जाते. विदर्भातील गोंड जाती मधील परधान या उपजातीमध्ये किंगरी किंवा बना वाद्यांच्या सुरावर मृत पूर्वजांचे गुण गातात. ते बना या वाद्यावर अतिशय प्रेम करतात. परंतु प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये वाद्यांचे स्वरूप सारखे नसते. आदिवासी लोक वाद्यपरंपरेचे जतन करतात व पुढील पिढीला ही वाद्यकला हस्तांतरित करीत असतात. वाद्य कलेच्या माध्यमातून आदिवासींनी आपल्या सांस्कृतिक परंपरा जोपासल्या आहेत. त्यामुळे वाद्यकला ही केवळ मनोरंजनाचे साधन नाही तर ते सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या साधनांपैकी एक साधन आहे. या कलेद्वारे आदिवासींची संस्कृती जिवंत राहिली आहे. या कलेच्या माध्यमातून आदिवासींनी आपली सांस्कृतिक परंपरा टिकून ठेवली आहे. ही बाब विशेष महत्त्वाची आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत संशोधनासाठी आदिवासी जमातींच्या वाद्य कलेचे अध्ययन या शोधनिबंधातून करण्यात येईल. त्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहे.

१) आदिवासी जमातीच्या वाद्य कलेचा अभ्यास करणे.

२) आदिवासी जमातीच्या परंपरागत वाद्यांच्या अनमोल ठेव्याचे जतन, संकलन आणि संवर्धन करणे.

३) आदिवासींच्या लोप पावत असलेल्या वाद्यांच संवर्धन करण्यासाठी उपायोजना सुचविणे.

४) आदिवासी जमातीच्या वाद्य संस्कृतीचा वारसा जतन करण्यासाठी शासनाची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्मम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे. तसेच आदिवासी जमातींची विविध पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादी साधनांचा सुद्धा वापर करण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्रातील आदिवासींची वाद्ये :**

आदिवासींची वाद्ये त्यांच्या परिसरात उपलब्ध होणाऱ्या वनस्पती व प्राण्यांच्मा चामड्यांपासून तयार केलेले असतात. ही वाद्ये साधी असून त्यातील सामग्री ही साधीच असते. समुह नृत्यात सर्वांनाच सहभागी होऊन आनंद लुटता यावा हा या मागचा मुख्य उद्देश असतो . नृत्याच्या साथीला असणारी चर्म वाद्ये आणि इतर वाद्य त्यांना सहजपणे उपलब्ध असणाऱ्या स्थानिक व नैसर्गिक वस्तूंच्या सहाय्याने ते स्वतःच बनवितात. ही वाद्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**ढोल :**

हे वाद्य आदिवासी नृत्यात फार लोकप्रिय आहे बकऱ्याच्या कमावलेल्या कातड्याने ते मडवितात वाजविण्यापूर्वी ढोलाची पूजा केली जाते ढोलाचे एक तोंड कधी टिपरीने तर कधी दोन काड्यांनी वाजवितात दुसरे तोंड बोटांनी व मनगटाने वाजवितात ढोल कधी जमिनीवर ठेवून तर कधी गळ्यात अडकवून वाजविला जातो ढोलाचा ध्वनी गंभीर व घुमणारा असतो, मंगल प्रसंगी ढोल वादनाला विशेष महत्त्व असते.

**ढोलक :**

हे वाद्य आंब्याच्या किंवा वडाच्या पोकळ लाकडापासून बनवितात हाताच्या बोटांनी ढोलक वाजवितात, ढोलकाच्या दोऱ्या सैल किंवा घट्ट करून आवाजात चढउतारपणा करता येतो बहुतेक आदिवासी नृत्यात ढोलक असतो ढोलक्यावरची थाप म्हणजे नाचायला नियंत्रण असे मानले जाते.

**पागई :**

हे वाद्य ढोला सारखेच असते पण मडक्याप्रमाणे माती भाजून बनविलेले असते यात भाजलेल्या मातीच्या दंडगोलाच्या दोन्ही तोंडाला कमावलेली कातडे बसविलेली असते.

**नगारा :**

हा ढोलाच्या मानाने लहान असतो लग्नप्रसंगी नगारा वाजवितात लग्नप्रसंगी व इतर वेळी ही वाद्य वाजवून काही आदिवासी आपला उदरनिर्वाह करतात.

**डफ :**

हे चर्म वाद्य आहे चार ते पाच इंच लाकडी फळीच्या एका गोल कडेवर कमावलेले कातडे मडवितात हे वाद्य बारीक काड्यांनी वाजवितात डफाचा आवाज खणखणीत यावा म्हणून डफ वाजविण्यापूर्वी विस्तवावर शेकला जातो.

**मांदळ :**

सागवानाच्या पोकळ गोल कोंडक्यास दोन्ही तोंडाला चामडे बसून हे वाद्य तयार केल्या जाते मोठ्या तोंडाला चिक्की लावून मग हे वाद्य वाजवितात या वाद्यास माघळ किंवा मादर असेही संबोधले जाते ढोलकीच्या आकारासारखे हे वाद्य असते.

**घंगळी :**

हे विणेच्या आकारासारखे वाद्य असते या वाद्यात दोन दुधी भोपळे असतात एका बाजूला वाकड्या तोंडाची वेळूची काठी बांधलेली असते त्या काठीला विणेच्या खोट्याप्रमाणे दोन खुंट्या बसविलेल्या असतात काठीच्या वाकड्या तोंडाला व खुंट्यांना तार बांधतात हे दोन्ही भोपळे बगलेत धरून छाती पुढे आलेल्या आडव्या तारांना दोन्ही हातांनी छेडतात एका गावात एखादाच घंगळी वादक असतो शुभ प्रसंगी व आनंदाच्मा प्रसंगी हे वाद्य वाजवितात धान्याची रास पडल्यावर तसेच मुलाच्या जन्मप्रसंगी हे वाद्य वाजवून नृत्य करतात हे वारली लोकांचे आवडते वाद्य आहे.

**तारपा :**

सुकलेला लांबट दुधी भोपळा बांबूच्या दोन नळ्या आणि ताडाची पाने यांच्या सहाय्याने हे वाद्य बनवितात गारुड्याच्या पुंगी सारखे हे वाद्य दिसते बांबूच्या नळ्या भोपळ्याच्मा एका बाजूस असतात आणि दुसऱ्या बाजूस भोंगा असतो एक जण तारपा वाजवितो आणि वर्तुळाकार फेर धरून नृत्य करतात तारपा वाजविणाऱ्याच्या सुरातील बदलाप्रमाणे नर्तकाचा पदम्मासही बदलतो. या नृत्याच्या निमित्ताने विवाह सुद्धा जमतात.

**काथ्या :**

हे वाद्य तांबे किंवा कास्याच्या भांड्यापासून बनवितात. भांड्याच्या फुगीर भागावर मडविलेले कातडे बसविलेले असते. त्याला लांब केस लावतात आणि त्यातून मधुर ध्वनी निघतो.

**डेरा :**

मातीच्या भांड्यापासून हे वाद्य बनवितात. भाजलेल्या मातीचा डेरा घेऊन त्याला माडाची किंवा सागाची पाने लावतात. हे वाद्य एका लांब काठीच्या सहाय्याने वाजवितात. प्रथम डेऱ्याची पूजा करतात आणि नंतर डेरा वादन करतात. या वाद्याची विशेषता म्हणजे हे वाद्य वयोवृद्ध स्त्रिया वाजवितात.

**तुणतुणे :**

पोकळ भांड्याला खालच्या बाजूने कमावलेले कातडे ताणून ताट बसविलेले असते. त्याला घोड्याचा केस किंवा तार बांधतात वर एक काठी असते. अंगठ्या जवळच्या बोटाच्या साहाय्याने किंवा काडीने आघात करून हे वाद्य वाजवितात. हे तंतुवाद्य विशेष करून ढोलकी सोबत वाजवतात.

**ताशा :**

हे टोपलीच्या आकाराचे चर्म वाद्य आहे. दोन्ही हातात काड्या घेऊन गळ्यात अडकविलेला ताशा वाजवितात. ताशा मंगल प्रसंगी वाजविण्याची प्रथा आहे.

**किंगरी :**

हे तंतुवाद्य धन कुलीच्या साहाय्याने वाजवितात. या स्वर वाद्यात तारा ऐवजी घोड्याचा केस बसविलेला असतो. किंगरी वादकास थोटी म्हणतात.

**टीमकी :**

मातीच्या वाढग्यासारख्या भांड्यावर कातडे कसून टिमकी हे वाद्य बनविली जाते. छोट्या काड्यांनी कमरेला बांधून हे वाद्य वाजवितात.

**उंडुडी :**

हे वाडग्यासारखे दिसणारे वाद्य आहे. त्याच्या पसरट भागाला कमावलेली कातडी ताणून बसविलेली असते. पसरट भागाचा व्यास साधारणपणे १२ इंचाचा असतो. दोन बारीक काड्या हातात धरून उंडूडी वाजवतात.

**तुर :**

हे पितळी किंवा काशाच्या थाळीवरचे छोट्या ढोला सारखे वाद्य आहे. कशाच्या थाळीत तुरीचा सर मेणाच्या साहयाने उभा करतात. त्या काडीवर वरून खाली बोटे फिरविली की गोड सूर लागतो. त्या सुरात कथा गीते गातात व नृत्य करतात.

**पिरी :**

जे आदिवासी लोक हरणाचे शिंग तोंडाने वाजवितात त्मांना पिरी म्हणतात. पावरी जमातीत यालाच पिरी म्हणतात. हरणाचे शिंग बांबू व वाळलेली पोकळ दुधी यापासून हे वाद्य बनवितात. याचा आवाज फार मंजुळ असतो.

**बना :**

बना हे परधान जमातीचे अत्यंत प्रिय वाद्य आहे. बना वाद्य साधारणपणे वैशाख महिन्यातील एखाद्या रविवारी बनवितात. त्या दिवशी उपवास करतात. जंगलात एकटे झाड निवडून त्याला बळी अर्पण करतात. दुसऱ्या दिवशी तोडून आणून देवतांची गीते गात वाद्य तयार करतात. रोज सकाळी थोडेसे का होईना बना वादन करून दिवसाची सुरुवात करतात. माडिया लोकांना जसा ढोल तसाच स्पर्धांना बना ही अभिमानाची बाब आहे

**टिपऱ्या :**

लाकडाच्या १२ ते १४ इंच लांबीच्या काठ्या आतून गोल करतात. त्यांची दोन्ही टोके जराशी निमुळती असते. क्रीडा प्रधान नृत्यात तालासाठी अशा टिपऱ्यांचा उपयोग केला जातो.

**पावा:**

डफा बरोबर प्रामुख्याने पावा हे वाद्य असते. बासरी पेक्षा थोडे मोठे असे हे वाद्य आहे. अडीच ते तीन फूट लांबीचे वेळूपासून बनविलेले हे वाद्य असते. त्याला तेल वगैरे लावून त्याची चांगली निगा राखतात.

वरील विविध प्रकारची वाद्य आदिवासी समाजात लोकप्रिय आहे. या वाद्य कलेच्या माध्यमातून आदिवासींनी आपली सांस्कृतिक परंपरा जोपासली आहे. त्यामुळे वाद्यकला ही केवळ त्यांच्या मनोरंजनाची साधने नाहीत तर सामाजिक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करणारी महत्त्वाची माध्यमे आहेत. या कलेच्या माध्यमातून आदिवासींची संस्कृती जिवंत राहिली आहे. ही बाब विशेष महत्त्वाची आहे. या माध्यमातून आदिवासी लोकांनी आपली सांस्कृतिक परंपरा टिकून ठेवली आहे .

**उपाय योजना :**

१) शालेय पातळीवर पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमात या वाद्य कलेचा समावेश करून इतर समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी या कलेचा समावेश अभ्मासक्रमात करावा.

२) आदिवासींच्या समृद्ध वाद्य कलेचे जतन करून इतरांमध्ये जागरूकता वाढवून संशोधनास चालना द्यावी यासाठी कलाप्रेमी आणि आदिवासी सामाजिक संघटनांनी प्रयत्न करावे.

३) जिल्हा व राज्यस्तरावर आदिवासी महोत्सवांच्या माध्यमातून प्रचार प्रसार करावा.

४) आदिवासींच्या सांस्कृतिक वारसाच्या संवर्धनासाठी आदिवासी सांस्कृतिक देवाण-घेवाण कार्मक्रमाचे आयोजन शासन स्तरावरून करावे.

५) आदिवासी वाद्य कलेच्या उत्तेजनार्थ सामाजिक संघटनांनी आदिवासी वादकांचे मेळावे घ्यावे. नवे वादक शोधून त्यांना प्रशिक्षित करून वाद्यकलेला चालना द्यावी.

६) आदिवासी महोत्सवाचे आयोजन करून परंपरागत आदिवासी वाद्यांचे प्रदर्शनी भरून वाद्यांची ओळख करून लोकांना प्रोत्साहीत करावे.

**निष्कर्ष:**

१) आदिवासी जमातीच्या वाद्य कलेची ही प्राचीन परंपरा लोपपावत असल्याचे दिसून येते. त्यामुळे या कलेचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासकीय पातळीवर वादकांना प्रोत्साहन देऊन लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती चा अभाव दिसून येतो. तसेच शासन स्तरावर उदासीनता आढळते.

२) शासनाच्या वन हक्क कामद्यामुळे आदिवासींचे जंगलातील निवास किंवा वास्तव्य नष्ट होत आहे. त्मामुळे वाद्य तयार करण्यासाठी लागणारे साहित्य मिळत नसल्याने आदिवासी लोकांमध्ये निरुत्साह दिसून येतो.

३) महाराष्ट्रात विविध आदिवासी समुदाय वनक्षेत्रात वास्तव्य करून वनातील पशुपक्षी प्राणी आणि वनस्पती यांचे संवर्धन करीत आहे. या नैसर्गिक सानिध्यातून आदिवासींना बाहेर काढल्याने वाद्य तयार करण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य जसे प्राण्यांची कातडी, हाडे, हरणाचे शिंग मिळत नसल्याकारणाने ही वाद्य कला लोप पावत असल्याचे निदर्शनास येते.

४) आदिवासींचे वास्तव्य असलेल्या प्रदेशात नागरिकीकरणामुळे तसेच रोजगारासाठी होणारे स्थलांतरणामुळे आणि आदिवासींमध्मे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या धर्मांतरणांमुळे सुद्धा ही वाद्य कला लोप पावत चाललेली आहे .

**संदर्भ सूची :**


१) डॉ.शैलजा देवगावकर नोव्हेंबर-२०११, ‘महाराष्ट्रातील आदिवासींचे लोक साहित्य’ , श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

२) डॉ. ऐस.जी.देवगांवकर ऑगस्ट-२०२१, ‘आदिवासी विश्व’ श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

३) Dr.Ram Kulsange- २०२१ “Tribes of Maharashtra” Ishika Publishing House, Jaypur.

४) डॉ. प्रदिप आगलावे, ऑक्टोंबर-२०२१ ‘आदिवासी समाजाचे समाजशास्त्र’ श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

५) विशेष मासिक -ऑगस्ट-२०२१, 'आदिवासी संस्कृती जपताना' प्रभात वृत्तसेवा.

६) गोविंद गारे - १९७९ 'भारतीय आदिवासी, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे.